# सामाजिक राजकीय सुधारक

## १] . बाबा आढाव

**प्रास्ताविक :**

डॉ. बाबा आढाव यांचा जन्म 1 जुन 1930 रोजी पुणे येथे झाला. ते व्यवसायाने डॉक्टर होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सत्यशोधक चळवळीचे संस्कार झाले. बाबा आढाव यांचे वडील व्यापारी होते. पुण्यातील कस्तुरे चौकात त्यांची पेढी होती. 1929 सालच्या जागतिक मंदीमध्ये त्यांचे व्यापारात नुकसान झाले. अल्पावधीत त्यांचे निधन झाले. वडिलांचे निधन झाले त्या वेळी बाबा अवघे दीड वर्षांचे होते. संकटांना न डगमगता बाबांच्या आईने सेवासदन संस्थेतील अभ्यासक्रम पूर्ण केला. आपल्या चार अपत्यांचे संगोपन त्यांनी धैर्याने आणि ध्येयवादाने केले. बाबांचे बालपण त्यांच्या आजोळी सेंडे यांच्या कुटुंबात गेले.

बाबांचे प्राथमिक शिक्षण पुणे नगरपालिकेच्या शाळा क्रमांक 9 मध्ये आणि माध्यमिक शिक्षण श्री शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये झाले. बाबांनी रसायनशास्त्रात बी. एस्सी. करून आयुर्वेद महाविद्यालयातून मिश्र वैद्यकशास्त्राची डी.ए.एस.एफ ही पदविका मिळविली. महात्मा गांधी पुण्यात निसर्गोपचार केंद्रात असताना बाबा येथे स्वयंसेवक म्हणून जात होते. 1952 साली बाबांनी अन्नधान्य भाववाढविरोधी सत्याग्रह केली. त्यांना तीन आठवड्यांची शिक्षा झाली. गोवामुक्ती आंदोलनात त्यांनी हिरिरीने भाग घेतली. जखमी सत्याग्रहींच्या शुश्रुषेसाठी त्यांनी एक वैद्यकीय पथक 1955 मध्ये गोव्याच्या सीमेवर नेले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात बाबा अग्रभागी होते. 1957 मध्ये त्यांनी कारावासही भोगला. डॉ धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षते खाली त्यांनी 1959 साली झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन परिषद घेतली.

* बाबा आढाव यांचे कार्य:

① एक गाव एक पाणवठा चळवळ:
जातीयवाद आणि अस्पृश्यताविरुद्ध त्यांनी दिलेला हा लढा महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासातील एक मैलाचा दगड मानला जातो. ग्रामीण भागात आजही दलित आणि सवर्णांचे पाण्याचे स्त्रोत वेगळे असतात. ही विषमता नष्ट करण्यासाठी त्यांनी एक गाव एक पाणवठा ही मोहीम राबवली. एकाच विहिरीवर किंवा पाणवठ्यावर गावाने एकत्र येऊन पाणी घ्यावे. जेणेकरून जातीभेदाच्या भिंती गळून पडतील असा त्यांचा आग्रह होता.

② सत्यशोधकी आणि समाजवादी विचारणी:
बाबा आढाव यांच्या विचारांवर महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोठा प्रभाव आहे. त्यांनी सत्यशोधक समाज त्यांनी महात्मा फुलेंचा सत्यशोधकी विचार आधुनिक काळात अधिक प्रबळ केला. अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा त्यांनी पुरस्कार केला. गरिबी आणि श्रीमंतीतील दरी कमी व्हावी. यासाठी ते कायम लोकशाही समाजवादाच्या बाजूने उभे राहिले.

③ विषमतेविरुद्ध लढा आणि उपोषणे:
अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी त्यांनी नेहमीच अहिंसक मार्गाचा अवलंब केला. राजकारणातील गुन्हेगारीकरण आणि भ्रष्टाचाराविरुद्ध त्यांनी वेळोवेळी आवाज उठवला. कष्टकऱ्यांचे हक्क वयाच्या ९० व्या वर्षीही त्यांनी असंघटित कामगारांच्या पेन्शनसाठी आणि हक्कांसाठी आंदोलने केली आहेत.

④ महत्त्वाच्या संस्था आणि उपक्रम:
कष्टकऱ्यांच्या मुलांनी शिकावे आणि प्रगत व्हावे

Scanned with CamScanner

यासाठी त्यांनी पुण्यात कष्टकरी विद्यापीठाची संकल्पना मांडली सण- उत्सव हे केवळ श्रीमंतांसाठी नसावेत. तर ते श्रमिकांच्या आयुष्यातही आनंद होऊन यावेत. यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले.

⑤ हमाल पंचायत :
डॉ. बाबा आढाव यांनी पुणे शहरात हमाल पंचायतीची स्थापना 1955 मध्ये केली. त्यापूर्वी 1948 मध्ये पुणे शहरात हमालांनी अन्यायाविरुद्ध एकत्र होऊन हमालांची पहिली संघटना स्थापना केली. पुणे शहरात विडी कामगार आणि महापालिकेतील सफाई कामगार संघटना अस्तित्वात आल्या. पुणे शहरातील गुलटेकडी या भागातील मार्केटयार्ड भागातील हमाल एकत्र आले. त्यांनी बाबांशी भेट घेतली. संघटना स्थापना करण्याचे ठरले. डॉ. बाबा आढाव अध्यक्ष तीन हमाल मदतनीस दोन आणे मासिक वर्गणी अशा प्रकारे श्रीगणेशा झाला. पहिल्या सहा महिन्यांमध्ये सभासद संख्या 700 झाली. व्यापारी हमालांचे शोषण करीत आहेत हे समाजाच्या लक्षात आले. यामुळे हमाल नेमणे वा काढणे, मजुरीदर ठरविणे यासाठी हमाल पंचायतीची परवानगी लागू लागली.

⑥ महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद :
1962 मध्ये महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद स्थापन झाली डॉ. दत्ता देशमुख त्याचे अध्यक्ष तर डॉ. बाबा आढाव सरचिटणीस झाले. परिषदेने शेतकऱ्याला बुडणाऱ्या जमिनीचे पैसे देऊन भागणार नाही. तर त्यांच्या भविष्यासाठी व विकासासाठी त्या शेतकऱ्यास शेतजमीन दिली पाहिजे अशी मागणी केली.

⑦ पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक :
पहिल्या अंक 1974 मध्ये प्रकाशित झाला. त्या वेळी अंकाची वार्षिक वर्गणी आठ रुपये होती. अंकाचे सुरुवातीचे नाव सत्यशोधक होते. पुरोगामी सत्यशोधकच्या पहिल्या

Scanned with CamScanner

अंकातील शिलाताई आढाव यांच्या लेखनामुळे देवदासी महिलांचे जीवन वास्तव समाजासमोर आले. परिणामत प्रतिष्ठानने देवदासी प्रथानिर्मूलन व पुनर्वसन परिषद आयोजित केली. कर्नाटक व महाराष्ट्राच्या सीमा भागात आंदोलने केली. बाबांच्या नेतृत्वाखाली चालविलेल्या आंदोलनामुळे महाराष्ट्र सरकारने देवदासी पुनर्वसन आयोग नेमला.

⑧ सामाजिक कृतज्ञता निधी:

महाराष्ट्रात ठिकठिकाणी काम करणाऱ्या विषमता निर्मूलन समिती च्या कार्यकर्त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी डॉ श्रीराम लागू, निळू फुले तारिर पूनावाला इत्यादिंच्या मदतीने निधी उभारण्यात आला. त्यात बाबा आढावांचा सहभाग होता. बाबा अध्यक्ष आणि डॉ. नरेंद्र दाभोळकर सचिव होते.

⑨ मोलकरीण पंचायत:

1980 मध्ये पुण्यात मोलकरणींनी पहिला संप केला. हा संप पगार वाढवून द्या या मागणीसाठी होता. २००२ मध्ये मोलकरीण पंचायत स्थापन झाली. या पंचायतीची पाक्षिक सभा महात्मा फुले प्रतिष्ठानच्या सभागृहात घेतली जात असे. या बैठकीत संघटनेचे काम, कौटुंबिक अडचणी, कामावरील अडचणी यांची चर्चा होत असे. या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या संघटित प्रयत्नांमधून महाराष्ट्र घर कामगार कल्याणकारी मंडळ कायदा 2008 अस्तित्वात आला. जिल्हा घरेलू मंडळ महाराष्ट्रात स्थापन झाली.

* समारोप:

बाबा आढाव यांच्या कार्याचे सार म्हणजे श्रमाला प्रतिष्ठा त्यांनी समाजाला शिकवले की, डोक्यावर ओझे वाहणारा हमाल असो वा रस्ता झाडणारा सफाई कामगार प्रत्येला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.

Scanned with CamScanner